# मराठी विभाग

## शैक्षणिक सत्र–२०१९–२०

## जगत कला,वाणिज्य व इं.ह.पटेल विज्ञान महाविद्यालय,गोरेगाव,जिल्हा–गोंदिया

**मराठी विभागाविषयी :–**

जगत कला,वाणिज्य व इं.ह.पटेल विज्ञान महाविद्यालयांतर्गत आवश्यक मराठी या विषयाचे अध्ययन व अध्यापन कार्य केले जाते.मराठी विषय अनिवार्य आहे.पदवी स्तरावर बी.ए.प्रथम वर्ष ,बी.ए.व्दितीय वर्ष,तृतीय वर्षाला मराठी विषयाचे अध्यापनाचे कार्य केले जाते.वाणिज्य शाखेत बी.कॉम प्रथमवर्ष व बी.कॉम व्दितीय वर्षाला मराठी विषय अनिवार्य असल्याने अध्यापनाचे कार्य केले जाते.त्याचप्रमाणे विज्ञान शाखेत बी.एस्सी.प्रथम वर्षाला मराठी विषय अनिवार्य असल्याने अध्यापनाचे कार्य केले जाते.

जगत कला,वाणिज्य व इं.ह.पटेल विज्ञान महाविद्यालयांतर्गत कला विभागात सन १९९८–९९ या शैक्षणिक सत्रात मराठी साहित्य या विषयाच्या अध्ययन व अध्यापन कार्याला प्रारंभ झाला. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची वाङ्मयीन–साहित्यविषयक कलाभिरुची निर्माण व्हावी, साहित्यलेखनाची व वाचनाची आवड निर्माण व्हावी आणि त्यांच्यातील सुप्त कलागुणांना वाव मिळावा या हेतूने प्रेरित होऊन मराठी वाङ्मय मंडाळाची निर्मिती करण्यात आली. या वाङ्मय मंडळाची वाटचाल सन २००० पासून आजतागायत अविरतपणे सुरु आहे.

**पदवी स्तरावरील मराठी अभ्यासक्रमातील विषय–**

बी.ए.प्रथमवर्ष – साहित्यसंवाद भाग १

बी.ए.व्दितीयवर्ष – साहित्यसंवाद भाग २

बी.ए.तृतीयवर्ष – साहित्यसंवाद भाग ३

बी.कॉम प्रथमवर्ष – भाषादर्शन भाग १

बी.कॉम व्दितीयवर्ष– भाषादर्शन भाग२

बी.एस्सी.प्रथमवर्ष– शब्दगंध

**मराठी वाङ्मय अभ्यासक्रम –**

बी.ए.प्रथमवर्ष – प्रथम सत्र

कांदबरी– तहान

समीक्षा– साहित्यप्रकार :संकल्पना आणि स्वरुप

दुसरा सत्र

नाटक– अश्रूंची झाली फुले

समीक्षा– साहित्यप्रकार :संकल्पना आणि स्वरुप

बी.ए.व्दितीयवर्ष –तिसरा सत्र

तुकारामाचे निवडक १००अभंग

काव्यशास्त्र प्ररिचय

चौथे सत्र

कवितासंग्रह— रसयात्रा

काव्यशास्त्र प्ररिचय

बी.ए.तृतीयवर्ष — सत्र पाचवा

लीळाचरित्र—एकांक

दलित साहित्य:वेदना आणि विद्रोह

भाषाविज्ञान परिचय

सत्र सहावा

प्राचीन मराठी वाड्मयाचा इतिहास

गरुडझेप

भाषाविज्ञान परिचय

जगत कला,वाणिज्य व इं.ह.पटेल विज्ञान महाविद्यालयांतर्गत कला विभागात सन २००७—२००८ या श्शैक्षणिक सत्रात पदव्युत्तर पातळीवर मराठी या विषयाच्या अध्ययन व अध्यापन कार्याला प्रारंभ झाला. **पदव्युत्तर मराठी विभागात** खालील विषयांचे अध्ययन व अध्यापन केले जाते.

**एम.ए.मराठी प्रथम सत्र —**

१. मध्ययुगीन मराठी साहित्याचा इतिहास

२. साहित्यशास्त्र

३. कादंबरी

४. संत ज्ञानेश्वर

**एम.ए.मराठी व्दितीय सत्र** —

१. आधुनिक मराठी साहित्याचा इतिहास

२. आधुनिक कविता कविता

३.निबंधवाङम

४.साहित्यसमीक्षा

**एम.ए.मराठी तृतीय सत्र —**

१. मध्ययुगीन कविता

२. मराठी भाषिक अभ्यास

३. ग्रमीण साहित्य

४. दलित आंबेडकरवादी साहित्य

**एम.ए.मराठी चतुर्थ सत्र —**

१. मध्ययुगीन आधुनिक गद्य

२. भाषाविज्ञान

३ लोकसाहित्य

४ स्त्रीवादी साहित्य

मराठी विभागातील प्राध्यापकांची माहिती–

| अ. क्र. | प्राध्यापकांचे नाव | पद | पात्रता | छायाचित्र |
|---|---|---|---|---|
| १ | डॉ.चंद्रकुमार राहुले | मराठी विभागप्रमुख व सहयोगी प्राध्यापक | एम.ए.मराठी,बी.एड्. पीएच.डी.,नेट |  |
| २ | डॉ..चैनलाल राणे | सहयोगी प्राध्यापक | एम.ए.मराठी,एम.फील, पीएच.डी.,नेट |  |
| ३ | प्रा.लोकेश कटरे | घ.तासिका प्रमाणे प्राध्यापक | एम.ए.मराठी,बी.एड्. एम.फील,सेट, |  |

प्राध्यापकांचा अभ्यासपूरक उपक्रमात सहभाग –

**डॉ.चंद्रकुमार राहुले –**

संशोधनाचा विषय – भंडारा आणि गोंदिया जिल्हंयातील तमाशा या लोकनाटयाचा विवेचनात्मक अभ्यास

संशोधक मार्गदर्शक

विविध चर्चासत्रात सहभाग व लेख प्रकाशीत

मराठी प्राध्यापक परिषद सदस्य

विदर्भ साहित्य संघ सदस्य

आंबेडकरवादी संसद सदस्य

डॉ. आंबेडकर टिचर्स वेलफेअर असोशिसन

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ नागपूर विज्ञानभाषा अभ्यासमंडळ सदस्य

**डॉ.चैनलाल राणे –**

विविध चर्चासत्रात सहभाग व लेख प्रकाशीत

मराठी प्राध्यापक परिषद सदस्य

नागपूर विद्यापीठ शिक्षक मंच सदस्य

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ नागपूर विज्ञानभाषा अभ्यासमंडळ सदस्य

संशोधनाचा विषय – 'डॉ.सुमती क्षेत्रमाडे यांच्या कादंबऱ्यांचा चिकित्सक अभ्यास'

**प्रा.लोकेश कटरे–**

य.च.म.मुक्त विद्यापीठ समंत्रक

निबंधलेखन–'वि.भि.कोलते हयांचे साहित्य' या निबंधाला विद्यापीठस्तरीय व्दितीय क्रमांक

विविध चर्चासत्रात सहभाग व लेख प्रकाशीत

राज्यस्तरीय लोकमत युवा महोत्सव सहभाग

विविध वृत्तपत्रातून कवितालेखन

**मराठी विभागामार्फत पुरविणाऱ्या सोयी–सुविधा–**

घटक चाचणी व सराव परीक्षेचे आयोजन

व्याख्यानमालेचे आयोजन

निबंधस्पर्धेचे आयोजन

विद्यार्थी कविसंमेलन

नेट,सेट चे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

गटचर्चा व परिसंवादाचे आयोजन

## मराठी विभागातंर्गत राबविलेले उपक्रम–

**'रंग कवितेचे' कार्यक्रम:–**

मराठी वाङ्मय मंडळ व विदर्भ साहित्य संघ भंडारा यांच्या संयुक्त विद्येमाने 'रंग कवितेचा' या वाङ्मयीन उपक्रमाचा दुसरा भाग संपन्न झाला. अध्यक्षस्थानी कवी युवराज गंगाराम असून उपप्राचार्य डॉ.एस. एच.भैरम यांच्या शुभ हस्ते उद्‌घाटन झाले.प्रमुख उपस्थितीत कवी माणिक गेडाम, मराठी विभागप्रमुख डॉ.चंद्रकुमार राहुले हे होते.या भागाचे कवी डॉ.रविप्रकाश चंद्रिकापुरे तर निवेदक कवी,कथाकार तसेच चित्रकार प्रमोद अणेराव हे होते. या कार्यक्रमाचे औचीत्य साधून उपप्राचार्य डॉ.एस.एच.भैरम यांनी कवी व कवितेचे महत्व विशद केले.तसेच कवी माणिक गेडाम, कवी युवराज गंगाराम यांनी समोचित विचार मांडले.




**ग.दि.माडगूळकर व पु.ल.देशपांडे यांच्या जन्मशताब्दीनिमित्त पुलोत्सव कार्यक्रम:–**



जगत कला,वाणिज्य व इंदिराबेन हरिहरभाई पटेल विज्ञान महाविद्यालय गोरेगाव येथे मराठी वाङ्मय मंडळातर्फे ग.दि.माडगूळकर व पु.ल.देशपांडे यांच्या जन्मशताब्दीनिमित्त ग.दि. माडगूळकर व पु.ल.देशपांडे यांच्या साहित्याचा विद्यार्थ्यांना परीचय व्हावा तसेच वाङ्मयीन अभिरुची निर्माण व्हावी म्हणून गदिमायन व पुलोत्सवअतर्गत विविध कार्यक्रमाचे आयोजन प्राचार्य डॉ.एन.वाय. लंजे व उपप्राचार्य डॉ.एस.एच.भैरम यांच्या मार्गदर्शनाखाली मराठी

विभागप्रमुख डॉ.चंद्रकुमार राहुले,डॉ.सी.एस.राणे, प्रा.लोकेश कटरे,डॉ.रविप्रकाश चंद्रिकापुरे यांच्या नेतृत्वात महाविद्यालयात करण्यात आले. .

**व्याख्यान:—**

जगत कला,वाणिज्य व इंदिराबेन हरिहरभाई पटेल विज्ञान महाविद्यालय गोरेगाव येथे मराठी वाङ्मय मंडळातर्फे ग.दि.माडगूळकर व पु.ल.देशपांडे यांच्या जन्मशताब्दीनिमित्त पुलोत्सव व गदिमायन कार्यक्रम थाटात साजरा करण्यात आला.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एन.वाय.लंजे होते तर प्रमुख अतिथी म्हणून उपप्राचार्य डॉ.एस.एच.भैरम, प्रमुख वक्ता म्हणून गोंविदराव मुनघाटे महाविद्यालय,कुरखेडाचे मराठी विभागप्रमुख डॉ.नरेंद्र आरेकर,मराठी विभागप्रमुख डॉ.सी.टी.राहुले,डॉ.सी.एस.राणे, प्रा.लोकेश कटरे,डॉ.रविप्रकाश चंद्रिकापुरे इ.मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.

या कार्यक्रमाची सुरुवात ग.दि.माडगूळकर व पु.ल.देशपांडे यांच्या प्रतिमेसमोर दीपप्रज्वलनाने करण्यात आली. या कार्यक्रमाचे औचित्य साधून प्रमुख वक्ता डॉ.नरेंद्र आरेकर यांनी ग.दि.माडगूळकर व पु.ल.देशपांडे यांच्या साहित्यावर प्रकाश घातला.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी विभागप्रमुख डॉ.सी.टी.राहुले, संचालन प्रा.लोकेश कटरे तर आभार डॉ.सी.एस.राणे यांनी मानले.या कार्यक्रमाला महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.

**.निबंधस्पर्धा**:— 'ग.दि.माडगूळकर व पु.ल.देशपांडे यांच्या साहित्यातील जीवनदर्शन' या विषयावर निबंधस्पर्धा आयोजित करण्यात आली होती या स्पर्धेत बहुसंख्य विद्यार्थ्यांनी भाग घेतला.



**वक्तृत्वस्पर्धा** :— 'पु.ल.व ग.दि.माडगूळकर व्यक्ती व वाङ्मय' या विषयावर महाविद्यालयात वक्तृत्वस्पर्धा आयोजित करण्यात आली होती.या स्पर्धेत ग.दि.यांची भावकविता,ग.दि.यांचे वाङ्मय,पु.ल.यांचे विनोदी लेखन,पु.न.यांचे प्रवासवर्णन,पु.ल.यांचे साहित्य अशा विविध विषयावर वक्तृत्वस्पर्धा घेण्यात आली.अशाप्रकारे विविध कार्यक्रम घेण्यात आले करिता माहितीस्तव सादर.

**मराठी भाषागौरव दिन —**

मराठी वाङ्मय मंडळातर्फे कवी कुसुमाग्रज उपाख्य वि.वा.शिरवाडकर जयंतिप्रीत्यर्थ 'मराठी भाषागौरव दिन'थाटात साजरा करण्यात आला.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एन.वाय.लंजे होते तर प्रमुख अतिथी म्हणून उपप्राचार्य डॉ.एस.एच.भैरम, प्रमुख वक्ता म्हणून आदिलोक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य श्री.के.एस.वैद्य,मराठी विभागप्रमुख डॉ. चंद्रकुमार राहुले,प्रा.इ.व्ही.चंदनखेडे,प्रा.लोकेश कटरे,इ.मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.



उपप्राचार्य डॉ.एस.एच.भैरम यांनी मार्गदर्शन करतांना "मराठी भाषा आपली आई आहे तिचा आपण आदर केला पाहिजे" अशाप्रकारचे मौलिक विचार व्यक्त केले.प्रमुख वक्ता प्राचार्य श्री. के.एस.वैद्य यांनी "कवी कुसुमाग्रज हे मराठीतील मानवतावाद जपणारे उत्तम आशावादी,समाजनिष्ठ व भावनिष्ठ कवी होते, त्यांनीच खऱ्या अर्थाने मराठीला श्रीमंती प्राप्त करुन दिली" अशाप्रकारचे मौलिक विचार व्यक्त केले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षीय भाषणातून प्राचार्य डॉ.एन.वाय.लंजे यांनी "मराठी भाषा हृदयाची भाषा आहे, परंतु आज मराठी भाषेचा समाजाला विसर पडत आहे करीता मराठी भाषेचे संवर्धन व जतन करणे आपले सर्वांचे आद्यकर्तव्य आहे."अशाप्रकारचे मौलिक विचार व्यक्त केले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी विभागप्रमुख डॉ.चंद्रकुमार राहुले, संचालन प्रा.लोकेश कटरे तर आभार महेश चौधरी यांनी मानले

**निरोप समारंभ** –

मराठी वाड्मय मंडळातर्फे बी.ए.तृतीय वर्ष व एम.ए.मराठी व्दितीय वर्षाच्या निरोप समारंभ आयोजित करण्यात आला होता. अशाप्रकारे वर्षभर राबविलेले कार्यक्रमाचा अहवाल आहे.ण

**मराठी भाषा संवर्धन पंधरवाडा**:–



जगत कला,वाणिज्य व इंदिराबेन हरिहरभाई पटेल विज्ञान महाविद्यालय गोरेगाव येथे मराठी वाड्मय मंडळातर्फे मराठी भाषा संवर्धन पंधरवाडानिमित्त व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एन.वाय.लंजे होते तर प्रमुख अतिथी म्हणून उपप्राचार्य डॉ.एस.एच.भैरम, प्रमुख वक्ता म्हणून श.जा.ति.कनिष्ठ महाविद्याालयाचे मराठी विभागप्रमुख प्रा.मोरेश्वर पटले,मराठी विभागप्रमुख डॉ.सी.टी.राहुले,डॉ.सी.एस.राणे,प्रा.एकनाथ चंदनखेडे प्रा.लोकेश कटरे,. इ.मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.

या कार्यक्रमाची सुरुवात शारदा माता व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या प्रतिमेसमोर दीपप्रज्वलनाने करण्यात आली. या कार्यक्रमाचे औचित्य साधून प्रमुख वक्ता प्रा.मोरेश्वर पटले यांनी मराठी भाषेचे संवर्धन करणे काळाची गरज आहे हे पटवून दिले.तसेच प्राचार्य डॉ.एन.वाय.लंजे या कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी विभागप्रमुख डॉ.सी.टी.राहुले, संचालन प्रा.लोकेश कटरे तर आभार प्रा.एकनाथ चंदनखेडे यांनी मानले.या कार्यक्रमाला महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.

**मराठी विभागाला भेट दिलेल्या साहित्यीकांची यादी**:–

डॉ.प्रा.शैलेंद्र लेंडे मराठी विभागप्रमुख ,पदव्युत्तर मराठी विभाग ,रा.तु.म.नागपूर विद्यापीठ,नागपूर
डॉ.अनिल नितनवरे,मराठी विभाग,एम.बी.पटेल महाविद्यालय,साकोली,जि.भंडारा
डॉ.नरेंद्र आरेकर मराठी विभागप्रमुख, विद्याभारती महाविद्यालय,कुरखेडा, जि.गडचिरोली.
मा.हिरामण लांजे,नागपूर
डॉ.हरिश्चंद्र बोरकर, भिवापूर
डॉ.संजय पोहरकर,प्राचार्य,समर्थ महाविद्यालय,लाखनी,जि.भंडारा
डॉ.शरद मेश्राम,मराठी विभाग,एस.एस.जे.महाविद्यालय,अर्जुनी /मोर.
डॉ.राजेंद्र वाटाणे,मराठी विभाग ,कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,कोराडी जि.नागपूर
प्रा.संजय निबेंकर,मराठी विभाग,संताजी महाविद्यालय,पालांदूर जि.भंडारा

डॉ.चंद्रकुमार राहुले
मराठी विभागप्रमुख व
सहयोगी प्राध्यापक